जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 3 AUG 2021
पुढारी

# विद्यापीठ उन्हाळी सत्र ऑनलाईन परीक्षेला ३ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या आयोजित उन्हाळी सत्र अंतिम वर्ष अंतिम सत्र परीक्षेंतर्गत गुरुवारी ३,१०१ पैकी ३,०९३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली.

परीक्षा विभागाच्या वतीने विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांना १० ऑगस्टपासून प्रारंभ झाला आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे १,२०,७४० विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. गुरुवारी बी.कॉम. आयटी, बी.कॉम. बँक मॅनेजमेंट, बी.एस्सी.-बायोटेक, बी.सी.एस., बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बॅचलर ऑफ इंटेरिअर डिझाईन, बॅचलर ऑफ ड्रेस मेकिंग, बी.एस्सी. एम.एस्सी.-नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम.ए., एम.एस्सी. (इंडस्ट्रियल केमेस्ट्री, इनऑर्गेनिक केमेस्ट्री, (अप्लाईड केमेस्ट्री) एम.एस्सी.-शुगर टेक्नॉलॉजी आदी विषयांच्या परीक्षा सुरळीत झाल्या.

13 AUG 2021

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दोन मात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय प्रवेश

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची भूमिका

लोकसत्ता वार्ताहर

नांदेड : विद्यापीठासह महाविद्यालये ऑफलाईन सुरू करण्यासंदर्भात आढावा घेण्यात आला आहे. पुढील काही दिवसांत ऑफलाईन महाविद्यालये सुरू होतील; परंतु लसीच्या दोन्ही मात्रा (डोस) घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना लस उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडील उपलब्ध लशींमधून ३० टक्के कुप्या विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवाव्यात, अशा सूचनाही देण्यात आल्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी येथे सांगितले.

स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठास भेट देऊन विविध विभागांचा आढावा घेतल्यानंतर आयोजित पत्रकार बैठकीत ते बोलत होते. या वेळी नांदेड दक्षिणचे आमदार मोहनअण्णा हंबर्डे आणि नांदेड उत्तरचे आमदार बालाजी कल्याणकर यांची उपस्थिती होती.



### ३ हजार ७४ प्राध्यापकांच्या पदांना मंजुरी

प्राध्यापकांबरोबरच काही प्राचार्यांचीही पदे रिक्त आहेत. या पार्श्वभूमीवर २६० प्राध्यापकांची राज्यभरात भरती करण्यात आली असून एकूण ३०७४ पदांना मंजुरी देण्यात आली आहे; परंतु अर्थमंत्रालयाने यासंदर्भात भरती प्रक्रिया काही काळ थांबविण्याची मागणी केली असल्याने ती तात्पुरती थांबविण्यात आली असली तरी अर्थमंत्रालयाच्या परवानगीनंतर ती पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे सामंत म्हणाले.

> जिल्हाधिकाऱ्यांकडे उपलब्ध लशीमधून ३० टक्के लशी विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवाव्यात, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. नांदेडमधून हा प्रयोग सुरूकरण्यात येईल. - उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री

सामंत म्हणाले, की राज्यात एकूण ४२ लाख विद्यार्थी उच्च व तंत्रशिक्षण घेत आहेत. करोनामुळे ऑनलाईन सुरू असलेले वर्ग आता ऑफलाईन सुरू होऊ शकतील. त्यामुळे यासाठी तयारी सुरू आहे. लशीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश देण्यात येणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडे उपलब्ध लशीमधून ३० टक्के लशी विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवाव्यात, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. नांदेडमधून हा प्रयोग सुरू केला जाणार असून यंत्रणेने आदर्श पद्धतीने हा प्रयोग राबवावा. त्यानंतर या प्रयोगाची अंमलबजावणी केली जाईल.

**अण्णा भाऊंच्या नावे अध्यासन केंद्र**

नांदेडमधील अध्यापक महाविद्यालयाला जागा उपलब्ध करून देण्यात आली असून त्यासाठी १४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. पुढील महिन्यात काम सुरू केले जाणार आहे. नांदेड येथे स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करण्यासंदर्भात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने अध्यासन केंद्र सुरू करणार असल्याची माहिती सामंत यांनी त्यांच्या मागील दौऱ्यात दिली होती. आता यासंदर्भातील काम अंतिम टप्प्यात असून पुढील दोन–तीन दिवसांत माझी स्वाक्षरी झाल्यानंतर या कामाला सुरुवात होईल. त्यासाठी ५० लक्ष रुपयांचा निधी मंजूर केला असल्याचे सामंत यांनी सांगितले.

करोनाच्या पार्श्वभूमीवर रुग्णांसाठी व्हेंटिलेटरचे लोकार्पण करण्यासाठी सामंत बुधवारी सायंकाळी येथे दाखल झाले होते.

जनसंपर्क कक्ष
13 AUG 2021 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालये सुरू करण्याचा सध्या विचार नाही : सामंत

**सकाळ वृत्तसेवा**

**परभणी, ता. १२ :** ''कोरोना संसर्ग पूर्णपणे नियंत्रणात आल्याशिवाय महाविद्यालये सुरू करणे उचित होणार नाही. प्रत्येक जिल्ह्यांतून लसीकरणाचा अहवाल मागविण्यात आला आहे. या अहवालासह अन्य विविध बाबी पडताळूनच महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल,'' असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आज येथे सांगितले.

राज्यातील काही जिल्ह्यांत कोरोना रुग्णांचा आकडा खाली आलेला नाही. राज्यात सुमारे ४० लाख विद्यार्थी महाविद्यालयातून शिक्षण घेत आहेत. महाविद्यालये सुरू केल्यास ४० लाख



उदय सामंत

कुटुंबांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. सध्या या स्थितीचा आढावा घेतला जात आहे. प्राध्यापक, शिक्षकेतर, विद्यार्थ्यांसाठी लसीकरणाचा काही कोटा राखीव ठेवता येईल का, याची माहिती घेतली जात आहे. कोणत्या जिल्ह्यात किती टक्के विद्यार्थी संख्येवर महाविद्यालय सुरू करता येतील, याची चाचपणी सुरू असून, जिल्हानिहाय अहवाल मागविला आहे. त्याशिवाय जिल्हानिहाय झालेल्या लसीकरणाचाही विचार होईल, असे सामंत म्हणाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2021
लोकमत

# अण्णासाहेब डांगे यांची आज विशेष मुलाखत

कोल्हापूर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज, शुक्रवारी सकाळी अकरा वाजता शिवाजी विद्यापीठातर्फे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री अण्णासाहेब डांगे यांची विशेष ऑनलाईन मुलाखत प्रसारित करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' या यूट्युब वाहिनीवरून ही मुलाखत प्रसारित होईल. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के असतील, अशी माहिती कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. एम.टी. गोफणे यांनी दिली.